महाराष्ट्र शासन

क्रमांक: एसएसएन १०८८/१७०५-एन/माशि-१
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १२ जानेवारी १९८९.

प्रति

शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद,

विषय :- कै. मामासाहेब मोहोळ विद्याविकास मंडळाचे वारजे ता० हवेली येथील शाळेच्या परवानगी आदेशाच्या नुतनीकरणांबाबत

कृपया शासकीय पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन १०८७/ ७२०४ एन/माशि ७ दिनांक २५.१०.८७ अन्वये निर्गमित केलेले आदेश पहावेत.

२. संबंधित संस्थेला वारजे येथे जून १९८८ पासून विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा सुरु करण्यास संमती देण्यात आलेली होती. काही कारणास्तव संबंधित संस्थेने संबंधित शाळा जून १९८८ पासून सुरु करुन मूळ आदेशाचे नुतनीकरण व्हावे म्हणून विनंती केली आहे. शासनाने सदर विनंती स्वीकृत केली आहे. तथापि जून १९८९ पासून सदर शाळा नियमित करावी असे आदेश या विभागास प्राप्त झाले आहेत. वरील परिस्थितीत सध्याच्या कार्यपध्दतीप्रमाणे संबंधित संस्थेकडून पूर्वीचे अर्जशुल्क रु. २५/- वजा जाता राहिलेले अर्ज शुल्क रु. ९७५/- (रुपये नऊशे पंचाहत्तर फक्त) जमा करुन घेणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे कार्यवाही करुन संबंधित शाळेची तपासणी करुन आपला अहवाल पाठवावा. आपला अहवाल प्राप्त झाल्यावर सदर शाळा नियमित झाली आहे घोषित करणे शक्य होईल.

(सही)

( भा. प्र. धारप )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
अध्यक्ष, कै. मामासाहेब मोहोळ विद्याविकास मंडळ, राजगुरुनगर ता. खेड जि. यांच्याकडे माहितीकरता व योग्य त्या कार्यवाहीकरता रवाना.